# ‘महामेट्रो’तर्फे सुरक्षा सप्ताहास सुरवात

## रक्तदान शिबीर, स्पर्धा, व्याखाने आदी विविध उपक्रमांचे आयोजन

पुणे, दि. ८ मार्च, २०१८ : पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात सुरू असलेल्या मेट्रो प्रकल्पामधील अधिकारी आणि कामगरांमध्ये सुरक्षिततेसंबंधी जागृती व्हावी या उद्देशाने महामेट्रोच्या वतीने सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार दि. ५ ते रविवार दि. ११ मार्च, २०१८ दरम्यान हा साप्ताह साजरा करण्यात येणार असून या अंतर्गत कामगारांच्या सुरक्षिततेसंबंधी व्याख्याने, प्रश्नमंजूषा स्पर्धा आणि रक्तदान शिबिर आदी उपक्रम राबविण्यात येतील.

पुणे मेट्रोच्या वनाझ ते रामवाडी मार्गिकेचे प्रकल्प प्रमुख यांच्या हस्ते सप्ताहाचे उद्घाटन करून या सप्ताहाची सुरवात करण्यात आली. यावेळी कामगारांना ‘महामेट्रो’चे जनरल कंन्सलटंट यांनी सुरक्षितेसंबंधी विषयावर माहिती दिली. सप्ताहाच्या दुस-या दिवशी ‘हिप्रो सोल्युशन कंपनी’च्या प्रतिनिधींनी आपत्कालीन परिस्थितीतील बचाव कार्यासंबंधी प्रात्यक्षिके सादर करून कामगारांना मार्गदर्शन केले. याबरोबरच हडपसर येथील अक्षय ब्लड बँकेच्या सहकार्याने तिस-या दिवशी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. ‘नागराज कन्स्ट्रक्शन कंपनी’चे (एनसीसी) प्रतिनिधी, मेट्रो प्रकल्पाचे अधिकारी, प्रकल्पाचे जनरल कंन्सलटंट, यांबरोबर कामगारांनी देखील या वेळी रक्तदान करीत सामाजिक बांधीलकीचे दर्शन घडविले. मेट्रोचे अतिरिक्त प्रमुख, प्रकल्प प्रमुख यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन झाले. या वेळी चिफ रेसिडेंड इंजिनिअर, सहाय्यक महाव्यवस्थापक आदी उपस्थित होते. या शिबिरात भाग घेतलेल्या रक्तदात्यांना ब्लड बँकेतर्फे प्रमाणपत्रे देण्यात आली.

या सप्ताहाअंतर्गत येत्या गुरूवार दि. ८ रोजी मेट्रोच्या कामगांराची तर शुक्रवार दि. ९ मार्च रोजी कर्मचा-यांची सुरक्षाविषयक प्रश्नमंजूषा स्पर्धा घेण्यात येणार आहे. त्यातील विजेत्या स्पर्धकांना ‘एनसीसी’तर्फे पारितोषिके देण्यात येतील. याबरोबरच कामगारांसाठी एचआयव्ही चाचणी आणि टिटनेस इंजेक्शन (टीटी) शिबिर शनिवार दि. १० रोजी घेण्यात येणार असून रविवार दि. ११ रोजी भुगाव येथील लेबर कँपमध्ये त्यांच्यासाठी इंडोर गेम्सचे आयोजन करण्यात येणार आहे.

या सुरक्षा सप्ताहाचा समारोप समारंभ सोमवार सोमवार दि. १२ मार्च रोजी होणार असून, विविध स्पर्धांतील विजेत्या स्पर्धकांना पारितोषिके देऊन या वेळी सन्मानित करण्यात येणार आहे. या वेळी मेट्रोचे प्रमुख प्रकल्प व्यवस्थापक, अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक, सहाय्यक महाव्यवस्थापक, चिफ रेसिडेंट इंजिनिअर हे देखील उपस्थित राहणार आहेत. मेट्रोचे प्रमुख सुरक्षा व्यवस्थापक, सहाय्यक सुरक्षा व्यवस्थापक यांच्या संकल्पनेतून हा सुरक्षा सप्ताह राबविण्यात येत आहे हे विशेष.